ISSN2230-7850 Impact Factor :4.1625 (UIF)Volume - 6 | Issue - 5 | June - 2016
Indian Streams Research Journal

# लोकसाहित्याचे भवितव्य व संवर्धनासाठी उपाययोजना

वसुमती पाटील
मराठी विभाग प्रमुख , व्ही.यु.पाटील कला व कै. डा.बी.एस देसले विज्ञान महाविद्यालय, साक्री ता. साक्री, जि. धुळे.



**सारांश :-**
लोकजीवनाच्या सर्वांगीण अभ्यासाचे अत्यंत प्रभावी माध्यम म्हणून लोकसाहित्याकडे पाहिले जाते. पाश्चात्य संस्कृतीचे आंधळे अनुकरणहोत असतांना मानवी समाज आज एकासंक्रमण अवस्थेतून जात असतांन, स्थित्यंतरे घडत असतांना मात्र लोकवाङ्:मयाची निर्मिती पुढील काळातहोणे अशक्य आहे असे म्हणून चालणार नाही. त्यासाठी आवश्यक उपाययोजना केल्यास लोकसाहित्याचा अमूल्य वारसा जतन होऊ शकतो.

**मुख्य मुद्दे :-**लोकसाहित्याचे भवितव्य-आधुनिक युग- लोकमानस _उपाययोजना

**समस्या :-**

लोकसाहित्यविषयक अभ्यासाबद्दलची आस्था कमीहोत चालली आहे. लोकसाहित्य प्राचीन कालबाहय म्ळणून दुर्लक्षित होणार की काय असा प्रश्न उद्‌भवण्याची शक्यता आहे.

**महत्व :-**

कोणत्याही देशाच्या हितासाठीसांस्कृतिक ऐक्य आवश्यक असते.सांस्कृतिक ऐक्यसाठी स्वसंस्कृती सोबतच इतरांच्या संस्कृतीचा आदर असावा. आध्यात्मिक, सांस्कृतिक व नैतिक बाबींच्या उन्नतीसाठी लोकसाहित्याचा वारसा उपयुक्तठरतो.

**संशोधन पध्दती :-**

संदर्भग्रंथातील अध्ययन, संकलन, विश्लेषण पध्दतीनुसार विषयाचे विवेचन

भारतीय संस्कृतीही विविधतेने नटलेली आहे.वैविध्यपूर्ण अशा या संस्कृतीचे दर्शन लोकसाहित्याच्या दालनातहोते.लोकसाहित्यसमूहनिर्मितीअसते.लोकसाहित्य आणि समाज परस्परावंली आहेत.समाजजीवनात प्रत्येक व्यक्ती रुढी, परंपरा, रीति-रिवाज, प्रथा इ.गोष्टींचेसरंक्षण जतन करीत असते.त्यामागेत्याचे दोनहेतू साध्य होत असतात.एक म्हणजे व्यक्तीचे सामाजिक संबंध जोपासले जातात.दूसरे म्हणजेरोजच्या धकाधकीच्या जीवनात थोडाफार विरंगुळा आणि आनंद प्राप्त होत असतो.

आज माहिती -तंत्रज्ञानाच्या युगात मानवी जीवन व्यामिश्र गुंतागुंतीचे झाले आहे. जीवनाचे संदर्भ बदलले आहेत. आजच्या युगात मात्र लोकसाहित्याचे स्थान-महत्व किती याबाबतीत प्रश्न उदभवतात व त्या अनुषंगानेच लोकसाहित्याच्या भवितव्याची गंभीर बाब नजरेसमोर येते. लोकसाहित्य म्हणजे केवळ जुने परंपरांना चिकटून असलेले.वेळेच्या अपव्यय करणारे असा एक समज प्रचलित आहे.परंतु लोकसाहित्य सदैव

नवीन गोष्टींचा स्वीकार करीत असते. लोकसाहित्यहे जुनेही नसते नवे ही नसते. जुन्या गोष्टींमध्ये नव्यानेभर करुन नित्यनुतन असे असते लोकसाहित्यामध्ये त्या त्या काळातील समाजाच्या सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक, धार्मिक विचारधारांचा ही प्रभाव असतो.त्या संदर्भात डॉ.अनिल सहस्त्रबुध्दे लिहितात "लोकसाहित्यहे मानवी जीवनाच्या सुरुवातीपासुन मानवी जीवनाबरोबर नित्य प्रवाहीत होत आलेले असते.ते असे मानवी जीवन प्रवाहाबरोबर वाहत येत असलेतरीते सदैव वर्तमान असते.जीवनातील सर्व स्तरांतील अनुभूतीतून ते निर्माण होऊन प्रगटहोत असते.तसेच नवजीवनात प्रेरणा देत असतांनाच नवजीवनालाच आपणात सामावून घेत पुन्हा पुन्हा नित्य नव्याने प्रगटहोतच असते."[१] आज मानवाने आधुनिकतेनुसार आपले वेगळेपणे जपलेले असलेतरी लोकसाहित्याचे जतन त्याचे पालन कमी अधिक प्रमाणात का असेनाहोतांना दिसते आहे. आज पाश्चात्य संस्कृतीचे अनुकरण झपाट्यानेहोत चालले आहे.परंतू त्याच बरोबर आध्यात्मिक, सांस्कृतिक व नैतिक बाबींची घसरणहोऊन चालणार नाही. कारण उद्याची नवीन येणारीसंस्कृतीहीसांस्कृतिक एकतेवर अवलंबून राहणारी असेल. आपल्या देशातील भाषा-विविधता यामुळेसांस्कृतिक एकतेच्या बाबतीत अडथळा निर्माण होतांना दिसतो व अशावेळी लोकसाहित्याचे भवितव्य देखील धुसरहोतांना दिसते. शहरीसंस्कृती आधुनिकतेने झपाटलेली असलीतरी तिची पाळेमुळे ग्रामीण भागातच सापडतात.शहरी व ग्रामीण भागांना जोडणारीसांस्कृतिक एकताही एक महत्वपूर्ण कडी आहे.

लोकसाहित्याच्या भवितव्याविषयी ठोस व योग्य दिशेने विचार केल्यास एक बाबस्पष्टहोते की, सर्वप्रथम लोकसाहित्य पुरातन-प्राचीन-जुने असते किंवा कालबाहय आहेहा विचार सोडून लोकसाहित्याचे जतन करणे आवश्यक आहे. त्यासाठी लोकांच्या मुखोदगत (कंठस्थ) जेसाहित्य आहेते स्वर आणि शब्द मुद्रित स्वरुपात जतन करणे व ज्या परंपरा आणि जीवनपध्दतीमुळे या लोकसाहित्याचे वैभव टिकून आहे त्या परंपरा टिकवून ठेवणे, सांभाळणे. परंपरांना उत्कृष्टरित्या टिकवून ठेवण्यासाठी सामाजिक व्यवस्था आणि जीवनचक्र-ऋतुचक्र यांमध्ये त्यांना सामाविष्ट करणे योग्य ठरेल. परंतू आजचे जीवनचक्र धकाधकीचे असतांना परंपरा प्रथा-रुढीनुसार व्यवहार करण्यासाठी लोकांकडे वेळ नाही. उदा.- विवाह प्रसंग दोन-तीन तासांत उरकून टाकणे, सामाजिक विधि आता निरर्थक वाटुन लुप्तहोतांना दिसतात. लोकांकडे आता निवांत वेळ नाही. आधुनिक तंत्रज्ञान व प्रगतीचा हव्यास यामुळे मानवाला उसंत नाही. अशा वेळी पूर्वीचे लोकसाहित्य त्याच स्वरुपात आज टिकून राहील असे सांगता येत नाही.परंतू पुर्णपणे नष्टहोईल असेही नाही.त्यामध्ये बदल होणार जसे की लग्नगीत, विधिगीत इ.ची चाल सांभाळून त्याचे ध्वनिमुद्रण, स्वरांकन केले जाणार. परंतूहे सर्व संकलन करीत असतांना निश्चितच परंपरांविषयी जागरुक असणे गरजेचे असेल.

कोणत्याही भाषेतील व देशातील लोकजीवनाचा धागा शोधण्याच्या दृष्टीने लोकसाहित्याचा अभ्यास आवश्यक आहे.परंतू माहिती तंत्रज्ञानाच्या युगात लोकसाहित्याचे स्वरुप ही बदलले आहे.तरी पण मानवी जीवनाशी संबंधीत कुठलाही घटकहा मात्र लोकसाहित्याच्या अभ्यासकक्षेत येतोच. तेव्हा लोकसाहित्याचे भवितव्य समृध्द करण्यासाठी लोकसाहित्याच्या सरंक्षण व संवर्धनासाठी लोकसाहित्याचे अध्ययन महत्वपूर्ण ठरते. त्या संदर्भात डॉ.तारा भवाळकर यांचे मत,- "अंतराळसंशोधनाच्या आणि तांत्रिक प्रगतीच्या युगात 'लोकसाहित्य', 'लोकसंस्कृती' यांचा अभ्यास करणे कितपत योग्य आहे असा एक प्रश्न निर्माण होतो. आश्चर्याची बाब म्हणजे अमेरिकन, जर्मनी आणि रशिया सारख्या ज्या देशांनी तांत्रिक क्षेत्रात प्रगतीची आघाडी मारलेली आहे. त्या देशातूनच आज लोकसाहित्यविषयक अभ्यासाबद्दल विशेष आस्था बाळगली जात आहे.विद्यापीठातून लोकसाहित्य विषयक स्वतंत्र अभ्यास विभाग सुरु झाले आहेत.या विषयावर मोठया प्रमाणावर ग्रंथ निर्मितीहोत आहे. आकाशाकडे झेप घेतांनाही मातीची ओढ संपन्न नसावी किंवा खोल मुळातूनच विस्तृत आकाशगामी वृक्ष वाढतात हेत तत्व येथेही लागू पडत असावे."[२] आजच्या यंत्रयुगात मानव जीवन सुसहय करण्यासाठी पुन्हा निसर्गाकडे धाव घेऊ लागला आहे. त्याचबरोबर मानवातील सदगुणांचा विकास, मानसिक स्वास्थ्य, धर्म निती-मानवता या सर्व गोष्टींच्या वृध्दीसाठी लोकसाहित्याचे जतन अर्थात संस्कृतीचे जतन आवश्यक आहे.

संस्कृतीसमाजाचे ज्ञानभांडार आहे.जीवनमुल्यांची गुंफन म्हणजेसंस्कृती, जीवन जगण्याची पध्दतीही जुनी पिढी नव्या पिढीला शिकवित असते.परंपरावरील विश्वास संक्रमीतहोत असतो.लोकसाहित्यात समाजमन दडलेले असते. लोकसाहित्यामधून लोकांच्या अतृप्त इच्छा-आकांक्षा, सुख-दुःख व्यक्त होतात. तेव्हा लोकसाहिच्याच्या जतनामुळे व्यक्तीची एकटेपणाची भावना कमीहोऊन समूहभावना वाढीस लागते.लोकांमध्ये भावनिकबंध जुळतात.समाजपरिवर्तन घडवून आणता येते.लोकसाहित्यहे नवनवीन बदल स्विकारत असते.लोकसाहित्यातून लोकजीवनाची कोणती ना कोणती गरजही भागविली जाते म्हणूनच लोकसाहित्य जिवंत स्वरुपात टिकून असते.

लोकसाहित्यातून नैतिकता जोपासली जाते.समाजातील निती नियमांचे पालन लोकसमूहाकडूनहोत असते. "पूर्वपरंपरांगत आलेले ज्ञानसंचित म्हणजेसाहित्य त्या साहित्याचा अभिव्यक्तीसाठी वापर करुन होणारा लोकसमूह म्हणजे लोक या लोक समूहाच्या परंपरा, चालीरिती, श्रध्दा, धर्मश्रध्दा इ. अंगांचा अभ्यास म्हणजे लोकसाहित्याचा अभ्यास होय."[३] लोकसाहित्याचा जतन-अध्ययनामुळे मानवी जीवनला उपकारक असे अलिखित नियम-संकेत मानव पाळीत असतो.समाजमान्य परंपरा टिकून राहातात.केवळ चांगल्याच गोष्टीसंक्रमणसंग्रहहोत असते असे नाहीतर समाजाला अमान्य नकारात्मक गोष्टीसुध्दात्यातून व्यक्त होतात.आणि त्याला आळा बसतो.सामाजिक संस्थंना पुष्टी मिळतेतसेच समर्थन लाभत असते.त्यादृष्टीने शासनामार्फत औपचारीक-अनौपचारिक असे केंद्र किंवा संस्था उभारल्या पाहिजे.

आजच्या युगात मानवाजवळ फुरसद नसेलतरी शेवटी माणूस जन्माला आल्यापासुन किंवा जन्मा अगोदरपासूनते त्याच्या मृत्युनंतरही समाजात ज्या अनेक विधी संस्कार पार पाडले जातात त्याबाबतीत निश्चितच की मानवी मन हे भूत-वर्तमान-भविष्य काळाला व्यापून व्यवहार करीत असते. निसर्ग प्रतिमा, प्रतिके, रुपके, संकेत इ.घटकांशी मानव एकरुप होऊन विधी, संकेत ठरवीत असतो.त्यादृष्टीनेमानव कितीही शिकलासुसंस्कृत, प्रगतिशील झाला तरी लोकसंस्कृतीशी निगडीत असलेल्या अनेक देव-देवता, सण-उत्सव,कुळाचार, नवस-सायास इ. पासुन

मुक्त राहू शकत नाही. कारण,- "लोकसाहित्यातून लोकमानस प्रकटहोत असते. या लोकानसावर प्रदिर्घ काळापासून यातु विचार, देहवाद व देववाद यांचा प्रभाव आहे.या तत्वत्रयींचा आविष्कार आज ही लोकमानसाच्या आविष्कारातून दिसून येतो."[४] त्या दृष्टीनेसंस्कृतीमधील काही प्रमाणके, मुल्य-श्रध्दा यांचा योग्य वापर केला पाहिजे.त्यामुळे मानवी वर्तन देखील नियंत्रणात राहू शकते.

लोकसाहित्याच्या उज्जव भवितव्यासाठी लोकसाहित्याचे भाविसंशोधन तुलनात्मक पध्दतीने केल्यास भिन्न-भिन्न विषयांमध्ये अनुबंध स्पष्टहोऊ शकतात.त्यासंबधीचे शास्त्रीय, अभ्यासनीय निष्कर्षहे लोकसंस्कृतीला पारंपारिक विषयाला व्यापक परिणाम प्राप्त करुन देऊ शमतील. त्यादृष्टीनेचे डॉ.तारा भवाळकरांनी मांडलेली व्याप्ती " कोणत्याहीसंस्कृतीचा सर्वांगणी अभ्यास लोकजीवनातील, लोकपरंपरेतील सर्व शब्दसाहित्या (कथा-गाथा, गीते, म्हणी, उखाणे इ.) सर्व प्रकारच्या धर्मश्रध्दा, विधी-विधाने, समजुती, चालीरिती, रुढी, लोकश्रम, अन्न-वस्त्र दैनंदिन जीवनात परंपरेने आलेल्या सर्व वस्तु, सर्व कला, कारागिरी या सर्व घटकांचा समावेश होतो. या सर्वांचा साकल्याने अभ्यास करण्यासाठी इतिहास, भूगोल, समाजशास्त्र, मानववंशशास्त्र, मानसशास्त्र, पुरातनशास्त्र, भाषाशास्त्र, धर्मशास्त्र, दैवतकथाशास्त्र या सर्व शास्त्रांचा प्रसंग परत्वे उपयोग केल्याखेरीज या अभ्यासाला परिपूर्णता येत नाही."[५]तुलनात्मक अध्ययनामुळेसंस्कृतीचे सातत्य टिकते.लोकसाहित्यहे समाजमानसाच्या आविष्काराचे माध्यम असल्याकारणाने समाजजीवनात होणारे जे काही परिवर्तन असतेत्याचे प्रतिबिंब लोकसाहित्यात उमटत असते.त्यादृष्टीने लोकसाहित्य नवनीवन बदल स्विकारते. जुने काही टिकवून नवे स्वीकारण्याची प्रक्रिया लोकसाहित्यात सतत चालते. लोकसाहित्यातून समूहभावाची निर्मितीहोत असते.समूहनिष्ठअस्मितेची जागृती निर्माण होत असते.लोकसाहित्यातून अनुभवाचे सार ज्ञान शिक्षणाच्या कोणत्याही माध्यमाशिवाय सहजपणे लोकांना मिळत असते.एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंतते परंपरेने प्राप्त होत असते.लोकसाहित्य आणि संस्कृतीहा अमूल्य वैभव किवां अनमोल खजिना आहेहे लोकांनासहज पटले पाहिजे. आज औपचारिक शिक्षणाबरोबर अनौपचारिक शिक्षणाची गरज नितांत आहे. आज मानवाने आकाशते पातळ अशी अमाप प्रगती केली असलीतरी शिक्षणाचा प्रमुखहेतू विश्वशांती होय, एकात्मताहोय. जगात आज आतंकवाद फोफावला आहे.अशा वेळी विविध कला प्रकारांची गंगोत्री असलेले लोकसाहित्यअनौपचारीक शिक्षणाच्या माध्यमातूनउपयुक्तठरते.

एकूणच वरील सर्व विवेचनातून सहजपणे लोकसाहित्याचे भवितव्य आणि उपायोजनेविषयी काही निष्कर्ष मांडता येतील.

- संस्कृतीमधील प्रमाणके, मुल्य-श्रध्दा यांचा योग्य वापर करावा.
- स्वयंसंस्कृती सोबतच इतर संस्कृतीबद्दल ही आपुलकीची भावना निर्माण व्हावी.
- शासनामार्फत औपचारिक सोबतच अनौपचारिक असे केंद्र किंवा संस्था उभारल्या पाहिजे जेणे करुन संस्कृतीचे जतन काही वेळेस अनुकरणाने व काही वेळेस ज्ञान देऊनहोत राहणार.
- लोकसाहित्याच्या तुलनात्मक अध्ययनामुळे विविध अभ्यासक्षेत्र खुलीहोतात. वेगवेगळया शास्त्रांशी लोकसाहित्याचा अनुबंध स्पष्टहोतो. उदा.- लोकसाहित्यातील लोकविधी, मंत्र-तंत्र, उतारे, तोडगे यांचा अनुबंध आजच्या आयुर्वेदाची जोडता येतो.
- लोकसाहित्यातील लोकगीत, कथा, म्हणी वाक्प्रचार इ. ठेवा जतन करतांना आजच्या आधुनिक युगातील आधुनिक साधन सामुग्री, यंत्रसाधनेसंगणक, कॅमेरा इंटरनेट इ. चा वापर केला पाहिजे त्यामध्ये काही बदल असलेतरी पण मुळ परंपरा जाणुन घेता येते.
- यंत्रयुग, विज्ञानयुग झपाटयाने बदलत असलेतरी त्या मानाने लोकमानसाचा विचार करुन लोकवारसा जपणारेजेलोकसंस्कृतीचे खरे उपासक असतात. त्यांचा सन्मान करुन योग्य मानधन देऊन प्रोत्साहन देण्यासाठी काही संस्था स्थापन केल्या पाहिजे.
- लोकसाहित्याची व्याप्ती व्यापक असल्याने भविष्यकाळात याचा अभ्यास करतांना आजच्या विज्ञानयुगाच्या सिंहाचा वाटा आहे. त्यामुळे श्रध्दा आणि अंधश्रध्दा यामधील भेद सहज लक्षात येतो. आज अंधश्रध्देमुळे समाज पर्यायाने राष्ट्र अधोगतीला जात आहे. शकून, अपशकून, विधी, रुढी परंपरा जोपासतांना समाजाला घातक अशा गोष्टी घडू नये याची दक्षता घेतांना लोकसाहित्यात काळानुसार नवे संस्करण करणयासाठी लोककलाकारांना प्रवृत्त करणे आवश्यक आहे.

एकूणच लोकसाहित्यहे नित्यनूतन असते.समाजपरिवर्तन होत असते.मानवीजीवनात आधुनिकीकरणने प्रवेश केलेला असला तरी मात्र रुढी, परंपरा, सण-उत्सव, रिती रिवाज, प्रथा या सर्व गोष्टींना मानवीजीवनातू वजा करणे शक्य नाही.त्याचे स्वरुप बदलेल परंतू मानवीजीवनचक्र आणि ऋतुचक्र नुसार लोक जीवनातील प्रथा, रुढी, विश्वास, संकेत यांची गुंफण घट्ट विणलेली असुनलोकसाहित्याच्या भवितव्यासाठी योग्य कालानुरुप उपाययोजना केल्यास लोकसाहित्याचा अमूल्य ठेवा जतन करणेसहज शक्य आहे.

**संदर्भसुची :-**

१) अनिल सहस्त्रबुध्दे- 'लोकसाहित्यविचार' सविता प्रकाशन, औरगांबाद- पृ.-३९
२) तारा भवाळकर- 'लोकसंचित' पृ.-१०
३) गंगाधर मोरजे - लोकसाहित्य आकलन व आस्वाद, पुणे- १९९३
४) प्रभाकर मांडे- लोकसाहित्याचे अंतप्रवाह, प्रस्तावना
५) तारा भवाळकर- 'लोकसंचित' पृ.-३८

**६)** प्रभाकर मांडे - लोकसाहित्याचे स्वरुप
**७)** रा.चि. ढेरे - संतसाहित्य आणि लोकसाहित्य
**८)** दुर्गा भागवत - लोकसाहित्याची रुपरेखा
**९)** ना.रा. शेंडे - लोकसाहित्यसंपदा